MHST200028132020

## वि.दि.दा.क्र.५२९/२०२३ मधील निशाणी क्र.१३५ वरील आदेश

प्रतिवादी क्रं.८अ ते ८क यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीचे साठेखतावरुन खरेदीपत्र करुन मिळावे याकरीता दाखल केला आहे. सदर प्रतिवादींविरुद्ध झालेला एकतर्फा आदेश रद्द केल्यास दाव्यातील सर्व वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर होण्यास मदत होणार आहे. वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर झाल्यास उभय पक्षकारांदरम्यान असलेला वाद कायमस्वरुपी संपणार आहे. एकतर्फा आदेश रद्द केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. प्रतिवादी क्रं.८अ ते ८क यांना अनुक्रमे नि.१०४, १०५, १०६ नुसार रजिष्टर पोष्टाने समन्स काढण्यात आले असता रजिष्टर पोष्टाचा रिपोर्ट हा सदर प्रतिवादी यांनी दि.२३/०१/२०२१ रोजी समन्स घेण्यास नकार दिला असा आलेला आहे. सदर प्रतिवादी यांनी समन्स घेण्यास नकार दिला म्हणजेच कायदयानुसार त्यांना दि.२३.०१.२०२१ रोजी समन्सची बजावणी झाली असल्याचे दिसुन येते. त्यानंतरही प्रतिवादी हजर राहिले नसल्याने त्यांचेविरुद्ध दि.२१.१०.२०२१ रोजी एकतर्फा आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दि.१२.०९.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादींना सुमारे ४ वर्षाहुन अधिक दिवसांचा विलंब झाला असल्याचे दिसुन येते. सबब, सदर अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश

पारीत करीत आहे :

## आदेश

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्रं.८अ ते ८क यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ४,०००/- (रु. चार हजार फक्त) जमा करावी. त्यापैकी रक्कम रुपये २,०००/- सरकार जमा करावी व उर्वरीत रक्कम वादी यांना दयावी.

३) वरीलप्रमाणे पुर्तता झाल्यावर प्रतिवादी क्रं.८अ ते ८क यांचेविरुद्ध झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येवून त्यांची कैफियत स्वीकारणेत येते.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.10.07 17:57:39 +0530

स्थळ : वाई. (ए. ए. पाचरणे)
दिनांक : ०७.१०.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.